**<u>ठळक बातम्या</u>**

- नवी दिल्ली इथं क्वाड देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांच्या बैठकीत परस्पर सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा /इतर देशांनाही मदत करण्यावर भारताचा भर

- प्रधानमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांची बारा वर्षं पूर्ण

- सावंतवाडी रेल्वे स्थानकाला मधु दंडवते यांचं नाव द्यायचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- कांद्याला २४ रुपये प्रतिकिलो हमीभावासाठी महाविकास आघाडीचं नाशिक जिल्ह्यात रास्तारोको /कांदा उत्पादकांच्या प्रश्नांवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारशी चर्चा सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या पात्रता फेरीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरु

**आणि**

- नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन आज केरळमधे होण्याची शक्यता

**<><><><><>**

नवी दिल्ली इथे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या अध्यक्षतेखाली आज क्वाड देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची बैठक झाली. क्वाड राष्ट्रांमधलं सहकार्य अधिक दृढ करण्यावर आणि त्याचबरोबर इतरांनाही मदत करण्यावर डॉ. जयशंकर यांनी या बैठकीत भर दिला. क्वाड राष्ट्रं ही लोकशाहीप्रधान, मुक्त समाज असलेली राष्ट्रं असून, समृद्धीसाठी नावीन्य आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन, तसंच दहशतवादाच्या सामायिक धोक्याचा सामना करण्यावर भर देतात, असं जयशंकर म्हणाले…

**होल्ड.. बाईट - जयशंकर**

क्वाड राष्ट्रांना आर्थिक धोरणात्मक साधनांचा लाभ घेण्यासाठी तसंच खाणकाम आणि प्रक्रिया तसंच महत्त्वपूर्ण खनिजांच्या पुनर्वापरासह महत्त्वपूर्ण खनिज पुरवठा साखळी मजबूत करण्याकरता गुंतवणुकीत समन्वय साधण्यासाठी 'क्वाड क्रिटिकल मिनरल्स फ्रेमवर्क' मार्गदर्शन करेल, असं अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो म्हणाले. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधे मुक्त आणि सुरक्षित सागरी मालवाहतूक सुनिश्चित करण्यासाठी तसंच पश्चिम आशियामध्ये स्थैर्य आणण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांची गरज जपानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री तोशिमित्सू मोतेगी यांनी व्यक्त केली.

या बैठकीत क्वाड देशांच्या सामायिक उद्दिष्टांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला, तसंच हिंद-प्रशांत महासागर क्षेत्राशी संबंधित प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाली, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव के. नागराज नायडू यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. या बैठकीत पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला, तसंच दहशतवादविरोधी कारवाईची गरज व्यक्त केली असं नायडू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांनी आज बारा वर्षं पूर्ण केली. ही बारा वर्षं म्हणजे भारताची संस्कृती आणि विकासमार्गात एक निर्णायक बदल घडवून आणणारा काळ असल्याचं मत, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केलं आहे. या काळात पायाभूत सुविधांचा विकास आणि निर्णायक जागतिक नेतृत्व तसंच मजबूत राष्ट्रीय सुरक्षा यांसह देशानं अभूतपूर्व प्रगती केली आहे, असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांची, ‘सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास’, ही घोषणा शासनाच्या प्रत्येक कृती आणि धोरणातून दिसून येत असल्यामुळे देश अतिशय मजबूत आणि आत्मविश्वासपूर्ण झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

सावंतवाडी रेल्वे स्थानकाला कोकण रेल्वेचे शिल्पकार माजी रेल्वेमंत्री दिवंगत मधु दंडवते यांचं नाव द्यायचा निर्णय महाराष्ट्र मंत्रिमंडळानं घेतला आहे. आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. त्यानुसार या स्थानकाचं नाव 'लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस' असं असेल. तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवला जाणार आहे.

महाराष्ट्रातल्या ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत मुंबई इथं झालेल्या उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत आज हा निर्णय झाला.

**<><><><>**

महाराष्ट्रात गावं, महानगरांसह जंगलांना लागून असलेल्या, सरकारच्या सर्व पडीक आणि महसुली जमिनींवर आता मोठ्या प्रमाणावर 'नेपियर ग्रास' आणि बांबूची लागवड करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. त्यासाठी ही जमीन स्थानिक महिला बचत गट, माविम अर्थात महिला आर्थिक विकास महामंडळ, तसंच सुशिक्षित बेरोजगारांच्या संस्थांना तीन वर्षांच्या भाडेपट्ट्यावर दिली जाणार आहे.

**<><><><>**

कांद्याला २४ रुपये प्रतिकिलो इतका हमीभाव मिळावा या मागणीसाठी आज नाशिक जिल्ह्यात चांदवड इथे महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली रास्तारोको आंदोलन करण्यात आलं. मुंबई-आग्रा महामार्गावरच्या या आंदोलनात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अंबादास दानवे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांच्यासह अन्य नेते, कार्यकर्ते आणि शेतकरी सहभागी झाले होते. गळ्यात कांद्याच्या माळा घालून तसंच

बैलगाडीतून आलेल्या नेत्यांनी, केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली. यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं.

**<><><><><>**

राज्यातल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारशी चर्चा सुरू आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना सांगितलं. या बाबतीत दीर्घकालीन उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी उद्या केंद्र सरकारशी चर्चा होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. कांदा खरेदीचा दर साडे तीन रुपयांवरून, केंद्र सरकारनं १५ रुपये प्रतिकिलो केला आहे. यावर विरोधकांनी राजकारण करू नये, असं ते म्हणाले..

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री ( २० सेकंद)**

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत पात्रता फेरीतला पहिला सामना आज धर्मशाला इथं गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या ७ षटकात १ बाद ८६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी.व्ही. सिंधू तसंच सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी आज दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. महिला एकेरी प्रकारात सिंधुने इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा वारदानी हिचा २१-१७, २१-१८ असा सरळ गेममध्ये पराभव केला. पुरुष दुहेरी गटात, रांकीरेड्डी आणि शेट्टी या जोडीने अमेरिकेच्या प्रेस्ली स्मिथ आणि चेन झी यी यांचा २६-२८, २१-१५, २१-१३ असा पराभव करत दुसरी फेरी गाठली.

<><><><><>

घुसखोरी आणि इतर कारणांमुळे होणाऱ्या लोकसंख्याशास्त्रीय बदलाचा सखोल अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती प्रकाश नावळेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली आहे. या समितीत माजी पोलीस अधिकारी दुर्गा शंकर मिश्रा, बालाजी श्रीवास्तव आणि अर्थतज्ञ डॉक्टर शमिका रवी यांचा समावेश असेल. गृहमंत्रालयाचे सहसचिव या समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन आज केरळमधे होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. केरळमधल्या १४ पैकी चार जिल्ह्यांमधे जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे. केरळ आणि लक्षद्वीप इथल्या १४ हवामान केंद्रांपैकी ६० टक्के केंद्रांवर, पुढचे दोन दिवस २ पूर्णांक ५ दशांश मिलीमीटर पावसाची नोंद झाली तर मान्सूनचं आगमन झालं असं अधिकृतपणे जाहीर केलं जाईल.

//<><><><><>//